# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## ‘‘लातूर जिल्हयातील महिला बचत गटांचे महिलांच्या आर्थिक व सामाजिक सशक्तीकरणातील योगदान’’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत मानव विज्ञान विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयात पीएचडी प्राप्त करण्यासाठी प्रस्तुत संशोधन आराखडा


संशोधक

कापसे निशिगंधा नागनाथअप्पा

मार्गदर्शक

डॉ.कोरपकवाड एकनाथ देवराव

प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

संशोधन केंद्र

शिवाजी महाविद्यालय, उदगीर

ता.उदगीर जि.लातूर

# लातूर जिल्हयातील महिला बचत गटाचे महिलांच्या आर्थिक व सामाजिक सशक्तीकरणातील योगदान

## १. प्रस्तावना:

भारतीय संस्कृती पुरूषप्रधान म्हणून ओळखली जाते. पुरूष वर्गाने स्त्रीयांना कमी लेखून त्यांचे क्षेत्र चूल आणि मूल एवढेच बंदिस्त केले. त्यांना बुध्दी नसते. त्या दुर्बल असतात त्यांना सामाजिक,शैक्षणिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात विकास करण्याकरिता वाव दिला जात नाही. स्त्रीया पती किंवा मुलांवर अवलंबून आहेत. तिचे सामाजिक स्वातंत्र्य एक तर तिच्या पतीने किंवा समाजाने मर्यादित केले आहे.[१]

शतकानुशतके गुलामगिरीमुळे मुळातच सबला असलेली स्त्री ही अबला होत गेली आणि म्हणून स्त्रीच्या सशक्तिकरणाची गरज निर्माण झाली. भारतीय राज्य घटनेत कलम १४ नुसार सर्व व्यक्ती समान आहेत. स्त्रीयांना केवळ अबला न बनविता त्यांना सबला बनविने ही प्रत्येकाची सामाजिक आणि सामुहिक बांधिलकी आणि जबाबदारी आहे. आजच्या जगात संस्कृती ही पुरूषप्रधान तसेच स्त्रीप्रधानही नाही तर ती अर्थ प्रधान आहे. स्त्रीयांच्या सर्वांगिन त्याच बरोबर विविध महिला विकास धोरण व आयोग यांची निर्मिती करून त्याची अंमलबजावणी करून महिलांचे सशक्तिकरण करण्याचे शासन प्रयत्न करत आहे. यामध्ये महिला बचत गटाची भुमिका मुख्य आहे.

## बचत गटाची पार्श्वभूमी

जागतिक स्तरावर स्वयंसहाय्यता गटाला दारिद्रय निर्मुलनाचे व महिलांचे वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय माध्यम म्हणून एक वेगळे स्थान प्राप्त झाले आहे. स्वयंसहाय्यता बचत गटाची संकल्पना बांगलादेशातून विकसित झालेली आहे. बांगलादेशातील चितगाव विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ.महंमद युनूस यांनी स्वयंसहाय्यता बचत गट संकल्पनेची निर्मिती केलेली आहे. म्हणून त्यांना स्वयंसहाय्यता बचत गटाचे जनक असे संबोधले जाते. अर्थशास्त्रीय सिध्दांत आणि प्रत्यक्ष मानवी जीवन यांचा सहसंबंध अभ्यासण्यासाठी क्षेत्र कार्याच्या निमित्याने ते जोब्रा या खेडेगावात गेले तेथे त्यांनी गरीब माणसाच्या जीवनाबद्ल अभ्यास केला. तेथे त्यांनी दहा महिलांचा बचत गट स्थापना केला.

जगातल्या कुठल्याही बॅका गरिबांना विनाकारण कर्ज देत नाहीत आणि गरीब माणसाकडे तारण देण्याकरिता काहीच नसते याची जाणीव त्यांना झाली व १९८२ मध्ये महिलांचे बचत गट स्थापन करण्यास त्यांनी सुरूवात केली. प्रा.डॉ.महंमद युनूस यांनी बचत गटातील महिलांच्या सहकार्याने १९८३

साली बांगलादेश ग्रामीण बॅकेची स्थापना केली. या बॅकेतर्फे अविरत स्वयंसहाय्यता बचत गटाचे कार्य सुरू केले.

प्रा.महंमद युनूस आणि त्यांचे सहकारी यांनी जिद्, चिकाटी, मेहनत आणि प्रबळ आत्मविश्वासाच्या जोरावर बांगलादेश ग्रामीण बॅके तर्फे स्वयंसहाय्यता महिला बचत गटाची चळवळ संपूर्ण देशात राबवून गरिबीला तिलांजली दिली आहे.

''दारिद्रय निर्मुलन आणि महिला विकासामुळेच जगात शांतता निर्माण होऊ शकते आणि ते स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून शक्य आहे'' हे प्रा. डॉ.महंमद युनूस यांनी सिध्द केले आहे. म्हणून नोबेल पुरस्कार समितीने ही बाब लक्षात घेऊन जागतिक शांततेचा नोबेल पुरस्कार प्रा.महंमद युनूस यांना प्रदान केला आहे. यावरून स्वयंसहाय्यता बचत गटाच्या कार्याला विशेष महत्व दिसून येते. विकासाच्या सर्व क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविणे. स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे सामाजिक, आर्थिक, राजकीय सशक्तीकरणासोबत दारिद्रय निर्मूलन करण्याकरिता बचत गटाची निर्मिती केली जात आहे.

## २. बचत गटाची संकल्पना :

सर्वसाधारण १५ ते २० लोकांचा किंवा महिलांचा अनौपचारिक समूह निश्‍चित उद्दिष्ट घेऊन

स्वच्छेने एकत्र आलेला समूह म्हणजेच बचत गट होय. तसेच एकाच कारणासाठी गटातील लोकांच्या उन्नती, विकास व फायदयासाठी एकत्रित आलेला समूह होय.

बचत गट विकासात्मक स्वरूपाचे शिक्षण देण्यासाठीचे माध्यम होय. गरीब लोकांना त्यांच्या गरजा भागविण्यासाठी बॅक कर्ज देत नाही कारण त्यांच्याकडे ठेवीसाठी काहीच नसते तसेच सावकार जास्त दराने कर्ज देत असल्यामुळे त्यातून गरीब माणसाची लूट होत आहे. ही लूट थांबविण्यासाठी बचत गटाची संकल्पना उदयास आली यालाच स्वयंसहाय्य गट असेही म्हणतात.

गरीब गरजू लोकांनी विशेषत: स्त्रियांनी आपले आर्थिक प्रश्न सोडवण्यासाठी एकाच भौगोलिक प्रदेशात राहणाऱ्या समान आर्थिक व सामाजिक स्तर असलेल्या स्त्रियांना एकत्रित करून तयार केलेला संघ अथवा समूह स्वयंसहाय्यता गट म्हणून ओळखला जातो.[२]

थोडक्यात बचत गटाची कल्पना सर्वासाठी सर्वजण अशी मांडता येईल. बचत गट ही गरीब लोकांशी संबंधीत संकल्पना आहे. बचत गटांना स्वयंसहाय्यता गट, शेजारगट, सुक्ष्मवित्त, लघु बचत गट अशा नावानेही ओळखले जाते.

**बचत गटाच्या व्याख्या :**

१. ''बचत गट म्हणजे समविचाराने प्रेरित होऊन एकसमान परिस्थितीत राहणाऱ्या ग्रामीण अथवा शहरी लोकांनी परस्पर समजूतीवर आधारित छोटया बचती मार्फत एकमेकांना आर्थिक मदत करण्याच्या हेतूने स्थापन केलेला गट होय''

२. ''महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी कोणतीही अट नसणारी महिलांना संपूर्ण स्वातंत्र्य देणारे आणि महिलांमधील सहनशीलता, कष्ट करण्याची जिद्, समजूतदारपणा, प्रामाणिकपणा आणि परत फेड करण्याची वृत्ती या गुणांना वाव देणारे आणि महिलांमधील निरीक्षणता, नेतृत्व, गुण, नियोजन यात वाढ करणारी योजना म्हणजेच स्वयंसहाय्यता बचत गट होय''[३]

**महिला बचत गट आणि सशक्तीकरण :**

महिला बचत गट हा फक्त महिलांचाच असतो यामध्ये १० ते २० महिला असतात आणि त्या महिला त्यांची जी अल्पबचत असते ती एक सामान्य खात्यामध्ये जमा करतात आणि ज्यांना कर्ज हवे ते नाममात्र व्याज दराने बॅकेकडून घेतात. बचत गट तयार करण्याचे मुख्य उद्दिष्ट हे सदस्यांमध्ये काटकसर करण्यासाठी प्रोत्साहन देणे व स्वयंरोजगार सुरू करण्याची तसेच सामुदायिक विकास वाढवण्याचा देखील प्रयत्न करणे.

प्रत्येक महिन्यात मासिक सभा आयोजित केली जाते. मासिक सभेत अनेक विषयावर चर्चा करतात. कर्जवाटप आणि परतफेड तसेच अनेक समस्यावर त्यांचे अनुभव शेअर करतात. महिला बचत गटांमध्ये तीन पदे असतात. अध्यक्ष, सचिव आणि खजिनदार तसेच लोकशाही कार्यपध्दतीने समान निर्णय घेणे, स्व–मदत, कर्जाची परतफेड आणि गट विकास ही तत्वे स्वीकारली. त्याचप्रमाणे आत्मीयता, विश्वास, सहभाग आणि जबाबदारी ही बचत गटाच्या दृष्टीकोनातून सामाजिक परिमाणाची मुख्य तत्वे आहेत.

बचत गटामध्ये महिलांचा सहभाग हे आर्थिक विकास वाढवण्याचे कारण बनले आहे. त्यांच्या कुटुंबाचा दर्जा उंचावण्यासाठी त्यांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे १९७६ मध्ये सुरू झालेल्या परंतु सरकारने जारी केलेल्या अध्यादेशाव्दारे अधिकृतपणे मान्यता दिलेल्या महिला सक्षमीकरणाच्या प्रकल्पांना चालना मिळाली. अर्थसंकल्पात महिलांच्या विकासाशी संबंधित उपक्रमामध्ये महिलांचा सहभाग वाढावा, यासाठी विविध सरकारी योजना राबवल्या जातात. बचत गटाच्या चळवळीने ही महिला सशक्तिकरणाचा प्रवास सुरू केला.

## महिला सशक्तीकरणाचा अर्थ :

सशक्तीकरण ही एक मजबूत आणि अधिक आत्मविश्वास बनवण्याची प्रक्रिया आहे. सशक्तीकरण ही अशी प्रक्रिया आहे ज्याव्दारे व्यक्ती किंवा गटांना त्यांच्या जीवनावर नियंत्रण ठेवण्याची शक्ती आणि क्षमता प्राप्त होते त्यामुळे आत्मविश्वास, निर्णय घेण्याची शक्ती, संप्रेषण कौशल्य यामध्ये सहभाग वाढवण्यास सक्षम करते.

महिलांचे सशक्तीकरण ही संकल्पना सर्वप्रथम ब्राझीलचे शिक्षण तज्ञ पावलो फ्रिरे यांनी उपयोगात आणली. सबलीकरण म्हणजे शक्ती, ही शक्ती सकारात्मक व नकारात्मक या दोन्ही बाजुने कार्य करते. दुर्बल महिलांना सबल करणे आणि त्यांना समान हक्क व संधी देणे हेच या मागील तत्व आहे.[४]

जागतिक बॅंक: ‘‘व्यक्तींना किंवा गटांना आपली पसंती ठरवण्याची व ही पसंती इष्ट त्या कृतीमध्ये आणि फलप्राप्तीमध्ये उतरविण्याची क्षमता वाढविण्याची प्रक्रिया म्हणजे सबलीकरण होय’’[५]

व्हिनेसा ग्रिफेन (१९८७) : ‘‘स्त्री सक्षमीकरण म्हणजे स्त्रीच्या अंगी निर्णय घेण्याची,नियंत्रण करण्याची, संघटित करण्याची क्षमता, मतप्रदर्शन करणे, कृतिशील कार्यक्रम घडवुन आणणे, लोकसंपर्क, जनसंपर्क, संस्थासंपर्क, आर्थिक व्यवहार इत्यादी करण्याची क्षमता व आवड निर्माण होणे’’[६]

### आर्थिक सशक्तीकरण

अमर्त्य सेन यांच्या मतानुसार ‘‘स्त्रियांना नेहमीच ज्यादा मोबदला मिळत नाही असे श्रम करावे लागतात’’ स्त्री नोकरी करणारी किंवा इतर व्यवसाय करून कमावती असूनही तिला आर्थिक स्वातंत्र्य मिळतेच असे नाही. १९८५ पर्यत महिलांच्या श्रमाची नोंदच घेतल्या जात नव्हती.[७] आज महिलांना नुसते सक्षम नव्हे तर बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक दृष्टया सशक्तीकरण ही काळाची गरज आहे. कृषी क्षेत्राच्या प्रगतीमध्ये ग्रामीण महिलांचे महत्वपूर्ण योगदान आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा साधारणत: ७०% भाग कृषी व कृषीशी संबंधित उद्‌योगाशी निगडित आहे.

नॅशनल कमिशन फॉर वुमन (NCW) स्त्रियांची स्थिती २००१ च्या अहवालानुसार भारतात महिला पुरूषापेक्षा जास्त तास काम करतात. स्त्रिया या स्वयंपाक करणे, साफसफाई करणे, पाणी आणि इंधन आणणे, गुरांसाठी चारा गोळा करणे, घराची काळजी घेणे अशा अनेक जबाबदाऱ्या

पार पाडतात. विकासाच्या संदर्भात समाजात महिलांना पुरूषाच्या बरोबरीने समान संधी उपलब्ध नाही. भारतीय पुरूषसत्ताक व्यवस्थेने स्त्रीचे क्षेत्र केवळ चूल आणि मूल एवढेच मर्यादित ठेवले.

यावरून असे दिसून येते की महिला सशक्तीकरणाची ध्येय साध्य करण्यासाठी संपूर्ण समाजाच्या मानसिकतेत बदल करण्याची नितांत गरज आहे. ग्रामीण भागात शेत मजुरी ही महिलांसाठी रोजगाराचा मुख्य स्त्रोत असल्यामुळे त्यांच्या सर्व गरजा पूर्ण होत नाहीत. या गरजा पूर्ण करण्यासाठी तसेच ग्रामीण भागात विकास घडवून आणण्यासाठी महिलांचे आर्थिक सशक्तीकरण करणे महत्वाचे आहे.

**सामाजिक सशक्तीकरण :**

भारतीय महिलांची सामाजिक स्थिती अत्यंत वाईट आहे. भारतीय संस्कृती ही पुरूषप्रधान संस्कृती असल्यामुळे महिलांना दुय्यम स्थान आहे. कुठल्याही सामाजिक कार्यात पुरूषांच्या तुलनेने स्त्रियांचा सहभाग कमी असतो. परंतु घटनात्मक व कायदेशीर दृष्टया स्त्री आणि पुरूष समान आहे. वास्तविक जीवनात महिला पुरूष जन्मदर, शिक्षण, आर्थिक आणि राजकीय अशा अनेक बाबींमध्ये असमानता दिसून येते.

परंतु आता अशी परिस्थिती बदलून स्त्री पुरूष समानता घडवुन आणण्याची वाटचाल सुरू आहे. आज स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावत आहे. स्त्रीकडे समाज विकासाचा केंद्रभूत घटक म्हणून पाहिले जात आहे. समान शिक्षण आणि समान रोजगाराच्या संधी यासाठी अनेक योजना राबवल्या जात आहेत.

सामाजिक सशक्तीकरणाचा अर्थ असा आहे की स्त्रीला तिच्या कुटुंबात आणि समाजात महत्वाचे स्थान मिळाले पाहिजे आणि तीला उपलब्ध संसाधनाचा वापर करण्याचा अधिकार असावा.

**३ अभ्यास विषय निवडी मागील भूमिका :**

लातूर जिल्हयातील महिला बचत गटाचे महिलांच्या आर्थिक व सामाजिक सशक्तीकरणातील योगदान हा विषय निवडी मागील भूमिका अशी आहे की, लातूर जिल्हा हा कृषीप्रधान आहे. शेती हा प्रामुख्याने उदरनिर्वाहाचे साधन आहे.

शेती आणि त्यासंबंधी सर्व कामे स्त्रिया करत असतात. स्त्रियांच्या अंगी काटकसरपणा, काटकपणा, समंजसपणा, जिद्, चिकाटी व प्रबळ आत्मविश्वास असतो. स्त्रिया या कुटूंबाची संपूर्ण

जबाबदारी सांभाळणारी तसेच शेत आणि शेतीला पूरक असणाऱ्या जोडधंद्याचे व्यवस्थापन करणारी भूमिका बजावत असतात. अशा स्त्रीयाला आर्थिक सशक्तीरणाच्या माध्यमातून संधी मिळाल्या तर तिचा सर्वांगिन विकास होईल तसेच विविध गृह उद्योग व स्वयंरोजगार यात वाढ होईल. स्त्री स्वावलंबी होईल. या सर्व प्रक्रिया मध्ये बचत गटाचा महत्वाचा वाटा आहे. त्याची उपयुक्तता आणि मुल्यमापनासाठी या विषयाची निवड केली आहे.

लातूर जिल्हा महाराष्ट्राच्या मराठवाडयातील छत्रपती संभाजी नगर विभागातील एक जिल्हा आहे. लातूर, जिल्हा मुख्यालय व महाराष्ट्र राज्यातील १६ वे मोठे नगर आहे. लातूर जिल्हा प्रामुख्याने कृषि प्रधान आहे. कृषि कामामध्ये महिलांचा सहभाग महत्वाचा मानला जातो, त्यामुळे विकासाच्या बाबतीत तसेच आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात महिलांचा अपेक्षित सहभाग असेल. महिलांचा विकासातील सहभाग वाढविण्यासाठी महिलांचे सशक्तिकरण करणे गरजेचे आहे.

लातूर जिल्हयात ग्रामीण विकासात महिला बचत गटाचा मोठा सहभाग आहे. महिला बचत गटांनी सुरू केलेल्या लघुउद्योग व व्यवसायाने ग्रामीण विकास आणि महिलांचा आर्थिक विकास होत आहे किंवा नाही. लातूर जिल्हयातील ग्रामीण भागात महिला बचत गटाची भूमिका कशी आहे. बचत गटामुळे आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली किंवा नाही. त्यांच्या कुटुंबात उत्पन्नाचे प्रमाण वाढले किंवा नाही,त्यांना समाजात मान प्रतिष्ठा सन्मान मिळतो किंवा नाही, समाजातील असंघटित महिलांचे योग्य प्रकारे संघटन होत आहे किंवा नाही, त्यांच्या नेंतृत्वाचा विकास होत आहे किंवा नाही, तसेच महिला बचत गटाचे महिला सशक्तीकरणात कसे योगदान आहे. एकंदरीत महिला बचत गट आणि त्यांचे आर्थिक संबंध कसे आहेत यावर त्यांचा सर्वांगीण विकास अवलंबून आहे. अशा चिकित्सक प्रश्नांची उकल व अभ्यास करण्यासाठी संशोधन विषयाची निवड केली आहे.

## ४ अभ्यास विषयाचे महत्व :

महिलांना निकृष्ट कामे कमी मोबदल्यावर करावी लागतात. कामाचे स्वरूप, शोषण, लैगिक छळ, महिलांना समाजात दुय्यम स्थान, बेकारी, शैक्षणिक मागासलेपणा, निकृष्ट आहार व आरोग्य स्थिती बालविवाह, दारिद्रय, अधिकार व हक्काची जाणीव नाही. या व इतर अनेक समस्या महिलांसमोर आहेत. वरील समस्या दूर करण्याचा प्रयत्न शासन स्तरावर होऊनही या समस्या फारशा कमी झाल्या नाहीत. त्यामुळे महिला बचत गट चळवळीच्या माध्यमातून महिला सशक्तीकरणाची गरज आहे.[८]

महिला बचत गट चळवळीमुळे सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात प्रगती होत असल्याचे इतर ठिकाणच्या अभ्यासातून दिसून आले आहे. लातूर जिल्हयातील महिला बचत गटामुळे महिलांचे सशक्तीकरण झाले आहे का? तसेच महिलांची सामाजिक आर्थिक प्रगती झाली आहे का? यापूर्वी याचा अभ्यास कोणीही केला नाही. याकरीता लातूर जिल्हयातील महिला बचत गटाचे आर्थिक व सामाजिक सशक्तीकरणातील योगदान (२०१३—२०२३) हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**लातूर जिल्हयाचा आढावा :**

लातूर जिल्हा महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या सीमेवर आहे. १५ ऑगस्ट १९८२ ला उस्मानाबाद या जिल्हयाचे विभाजन होऊन लातूर जिल्हयाची निर्मिती झाली. लातूर जिल्हा हा एक प्राचीन जिल्हा आहे. इतिहासात राष्ट्रकूटांचे निवासस्थान अशी लातूर जिल्हयाची ओळख होती. राष्ट्रकुट राजा अमोघवर्ष हा लतल्लूर म्हणजेच आताचे लातूर याचा अधिपती होता सातवाहन घराण्याच्या काळात लातूर जिल्हा हा खुप समृध्द होता.

लातूर जिल्हा भारतातील महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा प्रदेशात आहे. जो दखखनच्या पठारावर १७° ५२ उत्तर ते १८° ५० उत्तर आणि १७° १८ते ७९° १२ पूर्वदरम्यान आहे.

लातूर जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ ७१५७ चौरस किमी आहे. जिल्हयाला पाच उपविभाग आणि दहा तालुक्यांमध्ये विभागले आहे. २०११ च्या जनगणनेनुसार लातूर जिल्हयातील गावांची संख्या ९४८ एवढी आहे लातूर जिल्हयाचे वनक्षेत्र एकूण भौगोलिक क्षेत्रफळाच्या ०.१७% एवढे आहे. लातूर जिल्हा हा गोदावरी नदीच्या खोऱ्यात येतो. जिल्हयात येणारे पाणी हे मांजरा नदीतून येते. जिल्हयात तावरजा, घरणे, देनरगण, तिरू ही प्रमुख धरणे आहेत.

लातूर जिल्हा हा महाराष्ट्रातील कृषि प्रधान जिल्हा म्हणून ओळखला जातो. लातूर जिल्हयात सुमारे ८० ते ८२ टक्के लोक शेती करतात. जिल्हयातील प्रमुख पीक ज्वारी हे असून खरीप व रब्बी अशा दोन्ही हंगामात घेतले जाते. लातूर जिल्हयात अनेक पर्यटन स्थळे आहेत.

**संशोधनाचा कालावधी:**

लातूर जिल्हयातील महिला बचत गटाचे महिलांच्या आर्थिक व सामाजिक सशक्तीकरणातील योगदान या संशोधन अभ्यास विषयासाठी व्दितीयक माहिती कालावधी हा २०१३—२०२३ घेण्यात आला आहे. तसेच प्राथमिक माहिती गोळा करण्यासाठी २०२३—२४ या वर्षाची निवड करण्यात

आली आहे. संशोधनकार्य सखोल आणि व्यवस्थितरित्या करण्यासाठी हा कालावधी निवडला आहे.

## ५. संशोधनाची उद्दिष्टे :

१. लातूर जिल्हयातील महिला बचत गटाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
२. महिला बचत गटाचे आर्थिक व सामाजिक सशक्तीकरणातील योगदान अभ्यासणे.
३. लातूर जिल्हयातील दारिद्रय रेषेखालील महिला बचत गट व सर्वसाधारण महिला बचत गटांचे तुलनात्मक अध्ययन करणे.
४. महिला बचत गटाच्या सदस्यांचे कौटुंबिक आर्थिक विकासातील व निर्णय प्रक्रियेतील सहभागांचा अभ्यास करणे.
५. महिला बचत गटाला मिळणाऱ्या शासकीय योजनांचा अभ्यास करणे.
६. महिला बचत गटाव्दारे महिलांच्या आर्थिक व सामाजिक सशक्तीकरणातील उणीवांवर उपाय सुचविणे.

## ६. संशोधनाची गृहितके :

प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहितके निश्चित केली असुन निष्कर्षा पर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

१. महिला बचत गटामुळे महिलांच्या कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावतो.
२. महिला सशक्तीकरणामुळे नेतृत्वगुणांना वाव मिळतो.
३. महिला बचत गटामुळे आर्थिक व सामाजिक प्रगती होते.
४. महिला बचत गटामुळे महिलांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारतो.
५. महिला बचत गटामुळे महिलांमध्ये असणाऱ्या सुप्त कौशल्य गुणांचा विकास होऊन कौशल्य व उद्‌योजकता वाढीस लागते.
६. महिला बचत गटामुळे कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावून दारिद्रयात घट होते.

## ७ संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने ज्या संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे ते पुढील प्रमाणे.

लातूर जिल्हयातील महिला बचत गटाचे महिलांच्या आर्थिक व सामाजिक सशक्तीकरणातील योगदान या संशोधन अभ्यास विषयासाठी लातूर जिल्हयातील महिला बचत गटाच्या माहितीचे संकलन व विश्लेषन केले जाईल. माहिती संकलनासाठी प्राथमिक माहिती संकलन पध्दत व व्दितीय माहिती संकलन पध्दत या दोन्ही पध्दतीचा वापर केला जाईल.

- **प्राथमिक पध्दत**

प्राथमिक माहिती म्हणजे माहितीच्या मुळ स्त्रोतापासून प्राप्त केलेली माहिती होय. यासाठी लातूर जिल्हयातील सर्व तालुक्यातील बचत गटांची निवड करण्यात आली आहे. बचत गटांची संख्या अधिक असल्यामुळे स्तरीय यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर केला जाणार आहे.

निरिक्षण, मुलाखत, अनुसूची इत्यादी प्राथमिक स्त्रोतांच्या साधनांचा वापर करून माहिती संकलित करून संख्याशास्त्राच्या साहयाने निष्कर्ष काढण्यात येईल.

**नमुना निवड :**

संशोधनासाठी निवडलेले बचत गट हे लातूर जिल्हयातील एकूण १० तालुक्यातील असतील. या प्रत्येक तालुक्यातील १५ बचत गट याप्रमाणे १५० बचत गट अभ्यासासाठी निवडले जातील. या बचत गटांची दारिद्रियरेषेखाली व सर्वसाधारण अशी विभागणी केली जाईल. त्यापैकी १०० महिला बचत गटांतील एकत्रित आर्थिक प्रगती व सशक्तीकरण अभ्यासले जाईल व उर्वरित ५० महिला बचत गटाच्या प्रत्येक महिला सदस्यांचे सशक्तीकरणाचा प्रश्नावली व्दारे माहिती (२०२३–२४) संकलित करून अभ्यास करून निष्कर्ष काढले जातील.

- **व्दितीय पध्दत :**

व्दितीय माहितीसाठी २०१३ ते २०२३ हा कालावधी निवडला आहे. हा अभ्यास प्राथमिक आणि दुय्यम साधनांवर अधारित आहे. यामध्ये डी.आर.डी.ओ. कार्यालयातील संकलित माहिती तसेच इतर प्रकाशित स्त्रोतांकडुन जसे नियतकालिके, मासिके, वृत्तपत्रे, संशोधन पर ग्रंथ आणि पुस्तके, जनरल वेबसाईटस इत्यादी दुय्यम साधने यांचा वापर करण्यात येणार आहे.

**विश्लेषण तंत्र (Analytical Technique) :**

संशोधन उद्दिष्टांची पूर्तता व गृहितकांची चाचणी करून सुस्पष्ट निष्कर्षा पर्यंत पोहचण्यासाठी खालील प्रमाणे विश्लेषण तंत्राचा वापर केला जाईल.

**अ) उद्दिष्टांची पूर्तता :** प्रकरण निहाय उद्दिष्टांची विभागणी करून सांख्यिकिय माहितीचे संकलन, वर्गीकरण व विश्लेषण केले जाईल आणि उद्दिष्टांची पूर्तता होते का ते तपासले जाईल.

**ब) गृहितकांची चाचणी :** गृहितकांच्या चाचणीसाठी काही सांख्यिकिय तंत्राचा वापर करण्यात येईल. महिला सशक्तीकरणाचे निर्धारके शोधुन त्यांचा महिलांच्या सर्वांगीण विकासावर होणारा परिणाम शोधला जाईल. यासाठी विविध सांख्यिकिय चाचण्यांचा आधार घेतला जाईल. तसेच बहुचल, प्रतिगमन, सहसंबंध इत्यादी साधने विश्लेषणासाठी वापरले जातील.

## ८ संशोधनाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधनात लातूर जिल्हयातील महिला बचत गटांनी महिला सशक्तीकरणात काय भूमिका बजावली आहे त्याचा अभ्यास करण्यात येणार आहे. या अभ्यासासाठी २०१३ ते २०२३ हा कालावधी निवडण्यात आला आहे. तसेच प्राथमिक माहिती गोळा करण्यासाठी २०२३ ते २०२४ या वर्षाची निवड करण्यात आली आहे. सदर अभ्यासातून निघालेले निष्कर्ष लातूर जिल्हयासच लागू असतील.

## ९ संशोधनाची मर्यादाः

लातूर जिल्हयातील महिला बचत गटाचे महिलांच्या आर्थिक व सामाजिक सशक्तीकरणातील योगदान या संशोधन अभ्यास पुर्ण करण्याच्या दृष्टीने विश्लेषणात्मक व सर्वेक्षणात्मक पध्दतीचा अवलंब केला जाईल. बचत गटांची संख्या मोठया प्रमाणात असुन केवळ कार्यक्षम निवडक बचत गटाचा नमुना दाखल अभ्यास करून निष्कर्ष मांडले जाणार आहे. प्रस्तुत संशोधन केवळ २०१३ ते २०२३ या कालावधी पुरता मर्यादित आहे.

**प्रकरण रचना**

प्रकरण १ प्रस्तावना

पहिल्या प्रकरणामध्ये संशोधन विषयाला अनुसरून सविस्तर पार्श्वभूमी, संकल्पनाचे स्पष्टीकरण, महत्व, उद्दिष्टे, गृहितके, संशोधन पध्दत इत्यादीचा समावेश असेल. तसेच या प्रकरणाच्या दुसऱ्या भागात बचत गटांशी संबंधित विविध योजनांचा आढावा घेतला जाईल.

प्रकरण २ लातूर जिल्हयाची अर्थव्यवस्था

या प्रकरणात लातूर जिल्हयाचे भौगोलिक स्थान व रचना यांचा थोडक्यात आढावा घेऊन लातूर जिल्हयाच्या अर्थव्यवस्थेची ठळक वैशिष्टे अभ्यासण्यात येणार आहेत.

प्रकरण ३ बचत गटांशी संबंधित साहित्याचा आढावा

या प्रकरणात यापूर्वी बचत गटांशी संबंधित संशोधन, संशोधन पत्रिका, प्रकाशित पुस्तके व अहवाल यांचा आढावा घेतला जाईल.

प्रकरण ४ लातूर जिल्हयातील महिला बचत गटांचा आढावा

या प्रकरणात लातूर जिल्हयातील १० तालुक्यांमध्ये कार्यरत असलेल्या महिला बचत गटापैकी काही ठराविक बचत गटांची निवड करून अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण ५ महिला बचत गटांमुळे महिलांचे आर्थिक आणि सामाजिक सशक्तीकरण

या प्रकरणात महिला बचत गटाची महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सशक्तीकरणात काय भूमिका आहे याचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण ६ सारांश, निष्कर्ष व शिफारशी

या प्रकरणामध्ये प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या लातूर जिल्हयातील महिला बचत गटांचे महिलांच्या आर्थिक व सामाजिक सशक्तीकरणातील योगदान या विषयाला अनुसरून कलेल्या अभ्यासातून निघालेले निष्कर्ष स्पष्ट करण्यात येणार आहेत.

## संदर्भ सूची


१. डॉ.विलास आढाव, महिला सबलिकरण, पृष्ठ क्र.२१
२. गांधींचे समग्र विचारमंच प्रकाशन, नागपूर, वर्धा, पृष्ठ क्र.३५
३. स्वयंसहाय्यता गट चळवळीत बॅंकांचा दृष्टीकोण, यश मंथन, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, यशदा, पुणे ०७, एप्रिल—जुन २००६, अंक १
४. फ्रिर पी.द., पॉलिटिक्स ऑफ एज्युकेशन, कल्चर पॉवर ॲन्ड लिबरेशन मॅकमिलन, लंडन १९८५
५. राजीव गोखले कित्ता (Ibid) मनोरमा प्रकाशन दुसरी आवृत्ती पुणे ०५ पृष्ठ ५८
६. प्रा.एम.यु.मुलानी, महिला स्वयंसहाय्यता बचत गट, डायमंड पब्लिकेशन, पुणे ३० वर्ष २००६ पृष्ठ क्र.५८,५९
७. UNDP 2005, (HDR)

८. अनघा जोशी, मी सबला, लोकसत्ता चतु:रंग पुरवणी, ०४ मार्च २००६, पृष्ठ ४
९. कुमार देवेंद्र, सामाजिक संशोधन पध्दती शास्त्र, दीप प्रकाशन नवी दिल्ली, १९९७ पृष्ठ ३०
१०. राजेश चौधरी, महिला बचत गट हस्त पुस्तिका, चौधरी लॉ पब्लिकेशन्स जळगाव, पुणे पृष्ठ ९१ ते ९३
११. डॉ.महंमद युनूस मुलाखत लोकराज्य डिसेंबर ०८, पृष्ठ क्र.१०
१२. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२२ पृष्ठ ३६ ते ३८
१३. Huis MA, Hansen N, Otten S, Lensink R. A three dimensional model of women's empowerment : Implications in the field of microfinance and future directions. Front Psychol. 2017;8:1678.
१४. Roy K, Chaudhury A. Influence of socioeconomic status, wealth and financial empowerment on gender differences in health and health care utilization in later life: evidence from india. Soc sci Med.2008;66 (9):1951- 62.
१५. Sharma B. level of women impowerment and its determinates in selected south Asian countries. IOSR J. 2005;20(4):94-105

**सांकेतिक स्थळे :**

1. www.mpscschool.in
2. www.bhashanmarathi.com
3. Wikipedia
4. www.allsarkariyojna.in

**संशोधक**

**कापसे निशिगंधा नागनाथअप्पा**

**मार्गदर्शक**

**डॉ.कोरपकवाड एकनाथ देवराव**
**प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग**
**महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय**
**उदगीर**